## प्रेसनोट

दि. ११/०६/२०२४

वासुली गांव तलाठी कार्यालय, ता. खेड, जि. पुणे येथील तलाठी यांचेवर
लाच मागणी व स्विकारले प्रकरणी कारवाई.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | म्हाळुंगे पोलीस स्टेशन, पिंपरी चिंचवड येथे गु.र.नं ३७०/२०२४ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७. |
| तक्रारदार | पुरुष, वय - २९ वर्षे |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | श्री. सतिश संपतराव पवार, वय ५२ वर्ष, पद – तलाठी (वर्ग-३), सजा - वासुली, ता. खेड, जिल्हा – पुणे. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ३०,०००/- रुपये |
| पडताळणीअंती लाच मागणी रक्कम | २०,०००/- रुपये |
| स्वीकारलेली लाच रक्कम | २०,०००/- रुपये (विस हजार रुपये) |
| पडताळणी दिनांक | दि. १७/०५/२०२४ |
| सापळा दिनांक | दि. १०/०६/२०२४ |

ठिकाण :- दिनांक १०/०६/२०२४ रोजी वासुली गांव येथील तलाठी कार्यालय, ता. खेड, जि. पुणे..

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांचे वडीलोपार्जीत शेतजमीनीचा ऑनलाईन सात-बारा उता-यावर त्यांचे नाव दिसत नसलेने त्यांचे ऑनलाईन नाव दिसणेकरीता वासुली तलाठी कार्यालय येथील तलाठी लोकसेवक सतिश पवार यांची भेट घेतली असता, लोकसेवक सतिश पवार यांनी तक्रारदार यांचेकडे ३०,०००/- रुपयांची लाच मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. येथे दिली होती.

सदर तक्रारीची पडताळणी पंचासमक्ष केली असता, दि. १७/०५/२०२४ रोजी लोकसेवक सतिश पवार यांनी तक्रारदार यांचेकडे वडीलोपार्जीत शेतजमीनीचा ऑनलाईन सात-बारा उता-यावर त्यांचे नाव दिसण्यासाठी पंचासमक्ष तडजोडीअंती २०,०००/- रुपयांची लाच मागणी करुन, दि. १०/०६/२०२४ रोजी लोकसेवक सतिश पवार यांनी तक्रारदार यांचेकडून रुपये २०,०००/- रुपये लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारल्यावर त्याना अटक करण्यात आली असून, त्यांचेविरुद्ध म्हाळुंगे पोलीस स्टेशन, पिंपरी चिंचवड येथे गु.र.नं ३७०/२०२४, भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस निरीक्षक प्रविण निंबाळकर तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२) अँन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३) व्हॉट्स-अॅप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४) व्हॉट्स-अॅप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५) ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
६) वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
७) ऑनलाईन अॅप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

(नितिन जाधव)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.

Scanned with CamScanner